
स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव



भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

२० वर्षे

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

ई पेपर वाचा
http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com

# प्रशासनाच्या निव्वळ फालतूपणामुळे रेशन दुकानदारांचे 5 महिन्यांपासून कमिशन थकीत; दिवाळीही गेली अंधारात!!

**मागील 5 महिन्यांपासून बीड तालुक्यात 346 दुकानदारांना कमिशनचा एकही रुपया न मिळाल्याने सापडले संकटात!!!**

**दिवाळीचा सण ही अंधारात गेल्याने आमच्यावरील हा अन्याय कधी संपणार? असा व्यक्त केला जात आहे संतप्त सवाल**

**मागील जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर अशा 5 महिन्यांपासून दुकानदारांचे कमिशन थकीत!!**

## बीड तालुक्यात 346 दुकाने, क्विंटल धान्यावर 150 रुपये कमिशन तर 5 महिन्यांपासून कमिशन थकीत!!

### थकबाकीमुळे इतरांप्रमाणे दैनंदिन गरजा भागवणे रेशन दुकानदारांना झाले कठीण!

● बीड तालुक्यात 346 दुकाने आहेत. शासनाकडून प्रत्येक क्विंटल धान्यावर 150 रुपये कमिशन दिली जाते. अशावेळी मागील जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर अशा 5 महिन्यांपासून दुकानदारांचे कमिशन थकीत आहे.

● या थकबाकीमुळे इतरांप्रमाणे दैनंदिन गरजा भागवणे रेशन दुकानदारांना कठीण झाले आहे. घर खर्च, मुलांचे शिक्षण आणि इतर गरजा भागविण जिकरीचे इहले. प्रशासनाच्या निष्क्रयतेमुळे दुकानदारांचा देखील संयम सुटू लागला आहे. 'आम्ही सेवा देतो, पण योग्यवेळी मोबदला नाही' अशास्थितीत दुकान चालवायचे तरी कसे? आम्ही जगायचे कसे? असा संतप्त सवाल दुकानदार विचारत आहेत.


### हा विषय या स्तरावरील नसून, मंत्रालयीन आहे!!

● रेशन दुकानदारांचा अंत पाहू नये. 5 महिने कमिशन बकल्याने दुकानदार हतबल झाले आहेत. त्यानाही इतराप्रमाणे कुटुंब आणि गरजा असतात, यामुळे तातडीने कमिशनच्या रक्कमा वितरित कराव्या, अशी प्रतिक्रिया स्वस्त धान्य दुकानदार संघटनेच्या एका पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

● दर महिन्याच्या 30 तारखेता या संदर्भातील माहिती आम्ही वरिष्ठ कार्यर्यालयाला सादर करतो, हा या स्तरावरील विषय नाही, मंत्रालयीन आहे, असं मत पुरवठा विभागातील एका कर्मचाऱ्याने सांगितले. कमिशन संदर्भातील अहवाल पाठवला आहे. ती रक्कम येताच विनाविलंब वितरीत करण्यात येईल, अशी प्रतिक्रिया एका जबाबदार कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली आहे.




**बीड : प्रतिनिधी**
**गोरगरिबांना स्वस्त दरात धान्य उपलब्ध करून देणारे बीड तालुक्यातील 346 स्वस्त धान्य दुकानदार स्वत : मात्र उपासमारीत असल्याची गंभीर बाब काही दुकानदारांनी बोलून दाखवली आहे. मागील 5 महिन्यांपासून त्यांना कमिशनचा एकही रुपया न मिळाल्याने ते संकटात सापडले आहे. दिवाळीचा सण अंधारात गेला. भावनिक होत दुकानदार आता व्यक्त होऊ लागले आहेत. आमच्यावरील हा अन्याय कधी संपणार? असा संतप्त सवाल रेशन दुकानदारांकडून उपस्थित केला जात आहे. लोकांच्या पोटाची काळजी घेतो. पण, आमच्या पोटाची काळजी घेणार तरी कोण? अशी व्यथा आता दुकानदार सांगू लागले आहेत.**



### आमच्या घरातील चूल विझली, याचे काय? या सर्व परिस्थितीकडे लक्ष देणार कोण!

● दरम्यान, तालुक्यातील सर्वच दुकानदार एकत्र येऊन या अन्यायाविरुद्ध आंदोलनाच्या तयारीत आहेत. 'आम्ही काम करतो, धान्य वाटतो, पण मोबदला न देता शासन आमच्याशी अन्याय करत आहे', अशी भावना सर्व दुकानदारांमध्ये आहे. अशावेळी स्थानिक प्रशासन मात्र मुंग गिळून गप्प आहे. अनेकवेळा निवेदने दिली. मात्र, प्रतिसाद मिळत नसल्याचे दुकानदार सांगतात. अशावेळी आमच्या घरातील चूल विझली, याचे काय? या सर्व परिस्थितीकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे आणि कमिशनची थकबाकी तातडीने दूर करावी, अशी मागणी दुकानदार संघटनेकडून जोर धरत आहे.

## उत्तम हजारे यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार

**➤ रविवारी साताऱ्यात वितरण, खा. उदयनराजे भोसले, मंत्री जयकुमार गोरे, मंत्री दत्तात्रय भरणे यांची प्रमुख उपस्थिती**




**➤ बीड : प्रतिनिधी**
बीड येथील पत्रकार उत्तम हजारे यांना महाराष्ट्र भूषण राज्यस्तरीय आदर्श पत्रकार दर्पणरत्न पुरस्कार जाहीर झाला असून, रविवार दि.९ नोव्हेंबर २०२५ रोजी पुरस्काराचे वितरण होणार आहे. खा. उदयनराजे भोसले, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण सोहळा होणार असल्याची माहिती आयोजक दत्तात्रय सयाजी फाळके यांनी दिली.

बीड येथील ज्येष्ठ पत्रकार उत्तम हजारे यांनी पत्रकारितेत केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत, डीएसपी न्यूज लाईव्ह मिडीया, जि. सातारा यांनी मंगळवारी पुरस्काराची घोषणा केली. बीडसह महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील मान्यवरांचा यावेळी सन्मान करण्यात येणार आहे. रविवार दि.९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वा. होणाऱ्या कार्यक्रमास खा. उदयनराजे भोसले, मंत्री जयकुमार गोरे, मंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासह आमदार अतुल भोसले, पोलिस अधिक्षक तुषार दोशी, डिजीटल मिडीया संपादक संघाचे अध्यक्ष राजा माने, सदाशिव खाडे, रेणुताई येळगावकर, मनोज घोरपडे, माजी आमदार दिलीपराव येळगावकर, डॉ. सुनील फरांदे, सुनील काटकर, धैर्यशील कदम, घनशाम सोनवणे, श्रीकांत देवकर, रणजित सावंत, नंदकुमार मोरे, अनिल माळी, अंकुशराव गोरे, सोमनाथ भोसले, उज्वला गाडेकर, अनिल देसाई, विनोद खाडे, गायिका गायत्री साळवे, हभप शिवानीताई शिंदे, वैभवी कांबळे, राहूल कोळी, काजल ढोणे आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सातारा जिल्ह्यातील वडूज येथील सौभाग्य मंगल कार्यालयाच्या सभागृहात हा पुरस्कार वितरण सोहळा होणार असून, या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक दत्तात्रय सयाजी फाळके, डीएसपी न्यूज व पत्रकार संघाने केले आहे.


## सौ. वृषालीताई नितिन जायभाये नगराध्यक्ष पदाच्या निश्चित उमेदवार

***एस.सी. महिलांसाठी नगराध्यक्ष पद आरक्षित झाल्यामुळे प्रस्थापित घराणे 'शहां' च्या राजकारणाला पूर्णविराम**

**मरहूम अथहर बाबर साहेब यांच्या स्वप्नातील 'बीड नगरी' साकारणार**



**➤ बीड : प्रतिनिधी**
सर्व डाव्या पक्षांना, पुरोगामी विचारांच्या तसेच शाहू, फुले, आंबेडकर आणि अण्णाभाऊंच्या विचारांच्या चळवळीतील सर्वांना सोबत घेऊन नगर अध्यक्षपदासह पूर्ण नगरपालिकेची निवडणूक बीड शहर बचाव मंच जनाधारावर व जनतेच्या आशीर्वादांवर लढवणार अशी आज घोषणा करण्यात येत आहे. "मरहूम आदरणीय अतहर बाबर साहेबांच्या" जाण्यानंतर त्यांच्यासोबतच नगरपालिकेत निस्वार्थ, भ्रष्टाचारमुक्त आणि पारदर्शक कारभार संपुष्टात आला. पुन्हा म्हणून आजतागायत निस्वार्थ, जनतेच्या सेवा उद्देशाने, भ्रष्टाचार मुक्त, पारदर्शक कारभार बीड नगरपालिकेमध्ये कधीच झाला नाही. कायम भ्रष्ट व्यवस्था निर्माण करून



सौ. वृषालीताई नितिन जायभाये



नितिन जायभाये

प्रदीर्घ असा तीन पिढ्यांचा काळ एकाच घराण्याने तिथे सत्ता भोगली. कायम मनमानी पद्धतीने भ्रष्टाचारी व्यवस्था निर्माण करत नगरपालिकेला तसेच शासनाच्या येणाऱ्या सर्व निधींना लुटण्याचा कार्यक्रम चालवला गेला. अलीकडच्या काळामध्ये सुद्धा रस्त्याची बोगस बिले उचलणे, एकाच रस्त्याची किंवा कामाची तीन–तीन वेळेस बिले उचलणे, अटल अमृत जल योजना व भुयारी गटार योजनां सारख्या अनेक योजना ज्यासाठी शासनाचा शेकडो कोटी रुपये निधी उपलब्ध झाला होता अशा सर्व योजना प्रस्थापित घराण्यांनी गिळंकृत केल्या. विकासाच्या नावाखाली सातत्याने बीड शहराला भकास करण्याचा कार्यक्रम राबविण्यात आला. बीड शहरांमध्ये ● पान २ वर...



## नितीन महुवाले यांची प्राथमिक आरोग्य केंद्र चऱ्हाटा येथे आरोग्य सहाय्यक पदी नियुक्ती

**➤ बीड : प्रतिनिधी**
नितीन महुवाले यांची प्राथमिक आरोग्य केंद्र चऱ्हाटा येथे आरोग्य सहाय्यक पदी नियुक्ती झाल्या बद्दल बीड तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संजय कदम यांनी सत्कार केला. सोबत वैद्यकीय अधिकारी डॉ. काकड, डॉ संजना गोपवाड, आरोग्य सेविका तांदळे, श्रीमती डिगे, आरोग्य कर्मचारी वर्ग रोहीत घोगरे, आण्णासाहेब उबाळे, भरत बासर, मनिषा सुरवसे, ज्योती सापते आदी.

## बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये समविचारी पक्ष संघटनेचा सक्षम पर्याय देण्यासाठी लवकरच बैठक – भाई मोहन गुंड

**➤ बीड : प्रतिनिधी**
बीड जिल्ह्यासह राज्यातील कार्यकाळ संपलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद व नगरपंचायतींच्या निवडणुका लवकरच जाहीर होणार आहेत. या पार्श्वभूमीवर भांडवलदार आणि प्रस्थापित पक्षांविषयी सर्वसामान्य नागरिकांचा विश्वास उरलेला नाही, अशा भावना व्यक्त करत शेतकरी कामगार पक्षाचे नेते व राज्य चिटणीस मंडळ सदस्य भाई मोहन गुंड यांनी बीड जिल्ह्यातील समविचारी पक्ष संघटनांच्या प्रमुखांसमवेत बैठक घेऊन जिल्ह्यात एक सक्षम पर्याय उभा करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.



भाई गुंड म्हणाले की, भांडवलदार व प्रस्थापित पक्ष केवळ स्वत :च्या संस्था, कारखाने आणि राजकीय अस्तित्व टिकविण्यापुरतेच कार्य करतात. त्यांनी आजपर्यंत सर्वसामान्य कार्यकर्ते व तरुणांचा कधीही विचार केलेला नाही. त्यामुळे या वेळी जिल्ह्यातील तरुणांना पुढे आणण्यासाठी आणि सर्वसामान्य जनतेचा आवाज होण्यासाठी समविचारी पक्ष आणि संघटनांना एकत्र करून जिल्ह्यात नवा राजकीय पर्याय देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

ते पुढे म्हणाले की, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद व नगरपंचायतींच्या सर्व जागा लढविण्याच्या दृष्टीने लवकरच समविचारी पक्षांचे नेते, कार्यकर्ते आणि सामाजिक संघटनांची महत्वपूर्ण बैठक आयोजित केली जाणार आहे. या बैठकीत ● पान २ वर...

**अनिल बोर्डे यांचे आवाहन** **➤ अधिकारी कर्मचाऱ्यांनी ओळखपत्र दर्शनी भागावर लावणे बंधनकारक आहे**

## बीड जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयात आय डी कार्डचा वापर तात्काळ करावा

**➤ जे अधिकारी आणि कर्मचारी ओळखपत्र बंधनकारक असताना वापरत नसतील त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी**

**➤ गेवराई / शेख खाजा**
जिल्ह्यातील सर्व शासकीय व निम शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना ओळखपत्र दर्शनी भागावर लावणे शासन स्तरावर बंधनकारक करण्यात आले आहे. तरी त्याबाबतची अंमलबजावणी अद्याप पर्यंत जिल्ह्यात कार्यालयात सुरू झालेली नाही असे निदर्शनास आले आहे. तरी याबाबतची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी अशी मागणी मा. जिल्हाधिकारी बीड व गेवराई येथील तहसील कार्यालयातील



नायब तहसीलदार सुभाषजी कट्टे यांना बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष तथा अध्यक्ष श्री जगदंबा ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था गेवराई अनिल बोर्डे यांनी निवेदनाद्वारे केलेली आहे.

जिल्ह्यातील सर्व शासकीय व निम शासकीय कार्यालयात अधिकारी व कर्मचारी यांना शासनाने कार्यालयीन वेळेत ओळखपत्र शरीराच्या दर्शनी भागावर लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्याची अंमलबजावणी कार्यालयात जिल्ह्यात सुरू झालेली नाही असे निदर्शनास येत आहे. तरी त्याची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी.

कर्मचाऱ्यांनी ओळखपत्र लावल्यास नागरिकांना अधिकारी व कर्मचारी तात्काळ ओळखता येतात. त्यामुळे शासकीय कामे वेगाने होतील व कामांमध्ये पारदर्शकपणा वाढेल व खाजगी व्यक्तीची कार्यालयात लुडबुड वाढणार नाही. कार्यालयात शिस्त निर्माण होईल. कार्यालयात येणाऱ्या नागरिकाची गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी.

तरी जिल्ह्यातील सर्व शासकीय व निम्म शासकीय कार्यालयात आयडी ओळखपत्राचा वापर 15 दिवसात नियमितपणे सुरू करावा. नसता संबंधित कर्मचाऱ्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनावर गेवराई ग्राहक पंचायत तालुकाप्रमुख प्रा. भानदास फलके, ए एल वायचळ, जे. आर जोशी, नितीन राठोड, चाऊस एस ए, वाहेद यासीन खान, संदीप राठोड आधीच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# उशीरा सुचलेलं शहाणपण...!

आज पारिजात सोसायटीमध्ये उत्साहाचे वातावरण होते. कारण ही तसेच होते. पेंडसे काकींच्या धाकट्या सुनेचे, रुपालीचे डोहाळे जेवण होते. सोसायटीतल्या सर्वच स्त्रिया पेंडसे काकींच्या घरी जमल्या होत्या. झेंडूच्या फुलांच्या माळांनी घर छान सुशोभित केले होते. रूपाली तिच्या रूममध्ये तयार होत होती. पार्लरवाल्या मुलीने तिला छान नटवले होते. नाकात नथ, नऊवारी पैठणी आणि तिच्या पेहरावाला साजेसा मेकअप यामुळे मुळातच गौरवर्णीय, सुंदर असलेल्या रुपालीचे रूप आणखीनच खुलून दिसत होते. ती बैठकीच्या खोलीत येताच सर्वच स्त्रिया तिच्या साज- शृंगाराचे तोंड भरून कौतुक करू लागल्या.

"सुनिता दृष्ट काढ बाई पोरीची !!. किती सुरेख दिसतेय. आणि धोतर- सदरा घालून अक्षयही कसला रुबाबदार दिसतोय. जोडा अगदी लक्ष्मी नारायणाचा हो!! शेजारच्या देसाई काकूंच्या शब्दांतून कौतुक ओसंडून वाहत होते. फोटोग्राफर फोटोशूट करत होता.

"अग ताई या झोपाळ्यात तू आणि भाऊजींनी बसायचे आहे. सुरेख फोटो यायला हवेत हं.!!" छोट्या बहिणीने तिचा हात पकडुन तिला अक्षयच्या शेजारी झोपाळ्यात बसवले. मग सुंदर खडे जडवलेला मुकुट आणि फुलांची परडी घेऊन, हातात धनुष्य-बाण घेऊन, असे कितीतरी सुंदर फोटो काढून झाले. दृष्ट लागावी असा तो कौतुक सोहळा. साऱ्यांचेच डोळे दिपून जात होते. फोटोशूट नंतर मुख्य विधी सुरू झाला. माहेरची ओटी, सासरीची ओटी भरून झाली.

"रुपाली आता झाकलेल्या दोन्ही वाट्यांपैकी एक वाटी उघड!!" 'अनुजा' रुपालीची मोठी जाऊ तिच्या पुढे झाकून ठेवलेल्या दोन वाट्या असलेले ताट ठेवून म्हणाली.

"अगो बाई, बर्फी....!! पेंडसे काकी नात येणार हो घरी तुमच्या. पहिली बेटी धनाची पेटी!!"

देसाई काकू आनंदात म्हणाल्या. सगळ्यांनीच मग टाळ्या वाजवून रुपालीचे कौतुक केले.

तितक्यात कुणाचे तरी लक्ष कोपऱ्यात बसलेल्या सायलीकडे गेले. "अग तू कशी आलीस या कार्यक्रमात ? माहीत आहे ना तुला हा डोहाळे शुभविधी आहे.? इथे विधवा स्त्रीने यायचे नसते." साधना वहिनी टोचून बोलल्या.

"अहो तिला एक कळत नाही, पण घरच्यांना तरी कळायला हवे ना साखरे काकूंचा टोला. सायली आता कावरीबावरी झाली. तिच्या डोळ्यातून गंगा- यमुना वाहू लागल्या. खरंच ती विधवा झाली यात तिचा काय दोष होता बरं? नियतीच्या खेळामुळे तिच्या नशिबी ते भोग आले होते. त्यात तिचा अपराध तर नव्हता ना? वर्षभरापुर्वी नवविवाहिता बनून आलेल्या सायलीच्या आयुष्यात असा दु:खद प्रसंग येईल अशी कुणी कल्पनाही केली नसेल. एका अपघाताचे निमित्त होऊन सागर तिला कायमचा सोडून गेला.

नशिबात आलेले हे दु:ख सहन करून सायली आपले जीवन जगत होती. त्यात एक गोष्ट दिलासा देणारी होती की तिचे सासु-सासरे तिला जीवापाड जपत होते. आपल्या एकुलत्या एक मुलाच्या मृत्यूनंतर ते तिलाच आपली लेक समजून तिच्यावर मायेचा वर्षाव करत होते. सासू- सासऱ्यांच्या या पाठिंब्यामुळेच सायली खंबीरपणे आपली शिक्षिकेची नोकरी करत होती. मुलांना तन्मयतेने शिकवताना आपले दु:ख विसरण्याचा प्रयत्न करत होती.

पण ही जमेची बाजू असली तरी विधवा स्त्रीने कोणत्याही शुभकार्यात जाऊ नये, आनंदाच्या प्रसंगात सहभागी होऊ नये अशा अनिष्ठ रीतींचे सावट होतेच तिच्यावर.

"कोण म्हणतं सायलीने या कार्यक्रमात भाग घेऊ नये? का? तिला मन नाही?



**विशेष**



● **प्रणाली म्हात्रे**, विक्रोळी मुंबई

आनंद घेण्याचा तिला अधिकार नाही? मी बोलावले आहे तिला डोहाळेजेवणाच्या कार्यक्रमाला. दुर्दैवाने तिच्या नशिबी वैधव्य आले, यात तिचा बिचारीचा काय दोष?"

पेंडसे काकी खणखणीत आवाजात बोलल्या.

सायलीला दोष देणाऱ्या बायकांचे बोलणे ऐकून त्यांना संताप आला होता.



मोठ्या आनंदाने त्यांनी सायलीला बोलावले होते. आणि तीही त्यांच्या गोड आग्रहाला मान देऊन छान तयार होऊनच आली होती.

आणि इथे आल्यावर ही बोलणी तिला ऐकून घ्यावी लागली होती. हा सगळा प्रकार चालू असतानाच सायली डोळे पुसत उठली आणि दरवाजाकडे चालू लागली होती.

तिचा हात पकडून पेंडसे काकींनी तिला परत फिरवले आणि सर्वांना उद्देशून म्हणाल्या.

"अग कोणत्या युगात वावरताय तुम्ही? शास्त्र-विधी पाळताना कुणाचे मन दुखवायचे नाही ही आपली संस्कृती. याच संस्कृतीत आपण वाढलो. असे असूनही वैधव्य आलेल्या स्त्रीची अशी अवहेलना करणे, म्हणजे गुन्हा आहे. अग तुमीच ना आता रुपालीने बर्फीची वाटी उघडल्याबरोबर घरात नात येणार म्हणून तिचे कौतुक केलेत. मग एका बाजूला मुलीच्या जन्माचे स्वागत करत असताना, एका विधवा झालेल्या मुलीला ती शुभकार्यात आली म्हणून दुषणे द्यायची ही कोणती रित तुमची? नशिबाने एखाद्याच्या वाट्याला दु:ख आले तर त्याला आधार देणे, साथ देणे म्हणजेच खरी संस्कृती असते."

सायली या कार्यक्रमात राहणार आणि इतकेच नाही तर रुपालीची ओटी देखील भरणार. ज्यांना या कार्यक्रमात आनंदाने सहभागी व्हायचे आहे त्यांनी नक्कीच सायलीला साथ द्या."

"ठीक आहे मग तू कर तिचा सत्कार. आम्ही निघतो!!"

असे म्हणून साखरे काकी पानसे ताईंचा हात पकडुन जायला निघाल्या. पण श्वेता पानसे ताईंनी त्यांना रोखून म्हटलं, थांबा काकी, पेंडसे काकी बरोबरच सांगत आहेत." एखाद्या स्त्रीला वैधव्य येणे, यात तिचा काहीच दोष नसतो. रुढी परंपरांमधील खरा अर्थ न जाणता रीतीरिवाजांचे स्तोम माजवून माणुसकी विसरण्यापेक्षा नव्या विचारांचे स्वागत करणे अधिक श्रेष्ठ आहे. हो ना? आधीच दु:खी असलेल्या सायलीचा असा अपमान करण्यापेक्षा आपण सर्वजणींनी मिळून तिला साथ द्यायला हवी."

"अगदी माझ्या मनातले बोललीस बघ श्वेता।",

घोसाळकर मावशी गहिवरून म्हणल्या.

हे सगळ संभाषण ऐकून साधना वहिनी आणि साखरे काकूंनी सायलीची माफी मागितली. साटम काकी तर म्हणाल्यादेखील "खरच सुनिता एक नवीन दृष्टी दिलीस तू आम्हाला. अगं किती चुकीचं वागत होतो आम्ही. पण तू आमच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातलंस !! नक्कीच यापुढे आमच्या हातून अशी चूक होणार नाही !!

हे सगळं ऐकून सायलीच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. सायलीने रुपालीची ओटी देखील भरली. आनंदात सर्वांची जेवणे झाली. अतिशय सुंदर रीतीने कार्यक्रम संपन्न झाला. डोहाळेजेवणाच्या कार्यक्रमाचा खरा खुरा आनंद सर्वांनाच मिळाला.

## आजचे राशि भविष्य

### मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

### वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

### कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

### तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

### वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

### धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

### मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# लासुर स्टेशन जिल्हा परिषद निवडणुकीत आ.प्रशांत बंब फिरवणार भाकरी इच्छुकांचा होणार मचाळा !!

**● लासुर स्टेशन जिल्हा परिषद गटात कुणाचा लागणार जॅकपॉट? ● महायुतीच्या आ.प्रशांत बंब व आ. सतीश चव्हाण यांच्यातच होणार जोरदार लढत**

➤ **गंगापूर : प्रतिनिधी**

शिवसेनेचा बालेकिल्ला असलेला लासुर स्टेशन जिल्हा परिषद गट यंदा एस.सी. महिलेसाठी आरक्षित झाला असल्याने भावी जिल्हा परिषद सदस्य होण्यासाठी देव पाण्यात बुडवून बसलेल्या भाजपच्या रवींद्र चव्हाण यांचा हिरमोड झाला लासुर स्टेशन गटातून अनुसूचित जाती या प्रवर्गातील महिलेला जिल्हा परिषदेत नेतृत्व करण्याची संधी मिळणार आहे मात्र या निवडणुकीत आ.प्रशांत बंब किंगमेकर ठरणार असल्याने भाजपात जोरदार इन्कमिंग सुरुवात झाल्याने आमदार बंब यंदा भाकरी फिरवून इच्छुकांच्या डावात मचळा घालून देणार हे मात्र नक्की.

याआधी लासुर स्टेशन गट एस.सी.पुरुष राखीव असताना भाई अनिल बापू जाधव, प्रकाश परोडकर यांनी या गटाच नेतृत्व केलेले आहे मात्र राजकारणात महिलांसाठी खुलेपनानं काम करण्याची पुरेशी संधी मिळत नसल्याने व जागा आरक्षित झाल्याने आता प्रत्येक पक्षाला उमेदवार शोधण्याची वेळ आली आहे आज लासुर स्टेशन परिसरात असं स्वयंभू नेतृत्व आपण जेव्हा शोधत जातो तेव्हा एकमेव नाव आपल्यासमोर येतो ते म्हणजे सामाजिक कार्यकर्त्या आणि पत्रकार सपना गायकवाड यांचं! मागील अनेक वर्षांपासून सामाजिक कार्य, पत्रकारिता या आधारे साहित्य, सांस्कृतिक कार्यक्रम, महिलांचे मेळावे घेऊन त्यांनी आपल्या नेतृत्वाचा ठसा उमटवला आहे. कुणाच्याही राजकीय आधाराशिवाय किंवा पाठबळा शिवाय त्यांनी अत्यंत कष्टातून आपलं नेतृत्व विकसित केलं असून संधी मिळाली तर या गटातला त्या एक सक्षम राजकीय पर्याय देऊ शकतात. पूर्वी वंचित बहुजन आघाडीत असताना एक आक्रमक पदाधिकारी म्हणून त्या परिसरात ओळखल्या जातात याशिवाय कुठल्याही राजकीय पक्षाकडे सक्षम महिला नसल्याने पक्षाचं काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या पत्नीला या जागेवर उभं करावा लागणार आहे महायुतीकडून ही जागा भारतीय जनता पक्षाला सुटण्याची शक्यता असल्याने लासुर स्टेशन बाजार समितीचे संचालक सुनील पाखरे, माजी उपसरपंच तथा बाजार समितीचे संचालक सुरेश जाधव, सपना गायकवाड, संदीप आमराव, ग्रामपंचायत सदस्य राजू गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते प्रा.शशिकांत सांगवीकर, माजी पंचायत समिती सदस्य उर्मिला विश्वनाथ बारसे, अशोक सौदागर यांच्या कुटुंबातील महिलेला संधी दिली जाऊ शकते तर महाविकास



आघाडीत ही जागा शिवसेनेला गेल्यास शिवसेना कार्यकर्ते संदीप आमराव, अमोल शिरसाट, प्रकाश परोडकर यांच्या कुटुंबातील महिलेला ही संधी मिळू शकते. नुकताच अजितदादा पवार यांच्या गटात प्रवेश केलेले माजी जिल्हा परिषद सदस्य अनिल बापू जाधव यांच्या कुटुंबाच हीं नाव आघाडीवर आहे. वंचित बहुजन आघाडी कडून संदीप गायकवाड, पवन साळवे यांच्या कुटुंबातील महिला उमेदवार राहू शकतात.

➤ **माळीवाडगांव गण :-** विधानसभा निवडणुकीत पैशाचा महापूर वाहिल्याने या गणातील सर्वच कार्यकर्त्यांनी आपल्या तलवारी म्यान केल्या आहे. पंचायत समितीला फारसे अधिकार राहिले नाही. आर्थिक उत्पन्न कमी असल्याने आणि निवडणुका खर्चिक झाल्याने या गणातील सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी सावध भूमिका घेतली आहे. जिल्हा परिषद गटातील उमेदवार सक्षम असेल साहेब किंवा भाऊ खर्चाची जबाबदारी घ्यायला तयार असतील तर पाहू!! असं वेट अँड वॉच च्या भूमिकेत सर्वच कार्यकर्ते आहेत. त्यामुळे या गटातून उमेदवार म्हणून कोणाचं नाव पुढे येत हे पुढच्या काही दिवसात स्पष्ट होईल तरीही सतीश चव्हाण यांच्याकडून वाल्मिक पाटील चव्हाण, प्रदीप पाटील चव्हाण तर आमदार बंब यांच्याकडून भाजपचे तालुकाद्यक्ष रवींद्र पाटील चव्हाण, राहुल थोरात, यांच्या कुटुंबतील सदस्य निवडणूक लढवण्याची शक्यता आहे

➤ **सावंगी गण :-** हा गण अनुसूचित जाती (SC) साठी राखीव झाल्याने जिल्हा परिषद उमेदवाराला ताकद मिळवून देणारा आणि सक्षम असणाऱ्या उमेदवाराला उमेदवारी दिली जाईल किंवा ज्याला जिल्हा परिषदला उमेदवारी मिळणार नाही त्या नावांपैकी ही यातून उमेदवार राहू शकतो.

### जातीय समीकरण व लक्ष्मीदर्शन घेणार मतदारांच्या मतांचा ठाव, आमदार बंब ठरणार किंगमेकर

● सध्या मतदारांना लोकसभा विधानसभा या निवडणुकीत आर्थिक समीकरणाची लालसा लागल्याने जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुका या आर्थिक गणितावर अवलंबून असणार आहे त्यामुळे जो पक्ष मतदारांना लक्ष्मी दर्शन देईल त्याच पक्षाचा जिल्हा परिषद अथवा पंचायत समिती सदस्य होईल यात शंका नाही तरीही उमेदवाराचा चेहरा पाहून व वर्तुनक पाहून जनता मतदान करीत अशी आशा करायला हरकत नाही.

# शिल्लेगाव जिल्हा परिषद निवडणुकीत संतोष जाधव तळ्यात की मळ्यात !

## वैजापूरचे आ.रमेश बोरनारे व दिनेश परदेशी यांच्यातून जातही नाही विस्तव तरीही दोघांचे फोटो जाधवांच्या पत्रकात

➤ **गंगापूर : प्रतिनिधी**





शिल्लेगाव जिल्हा परिषद निवडणुकीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागलेले आहे कारण निवडणुकीपूर्वी तळ्यात मळ्यात असलेले माजी बांधकाम सभापती संतोष पाटील जाधव यांनी फक्त निवडणुकीत तिकीट व चिन्हासाठी आ.प्रशांत बंब यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला आहे मात्र जर शिवसेना शिंदे गट व भाजपची युती झाली तर शिल्लेगांव जिल्हा परिषद गट शिवसेनेचा बालेकिल्ला असल्याने ही जागा शिवसेनेला सुटेल व संतोष पाटील जाधव यांची गोची होईल व त्यांची मागील कारकीर्द पाहता ते भाजपला जय श्रीराम करून अपक्ष निवडणूक लढवतील कारण सध्या कुठेही युतीची सूतराम शक्यता नसताना देखील जाधवानीं ज्या बैठका आयोजित केल्या आहेत त्यांच्या प्रसिद्धी पत्रकावर ज्यांच्यातून विस्तवही जात नाही असे आ.रमेश बोरनारे व माजी नगराध्यक्ष दिनेश परदेशीं यांचा फोटो छापलेला वैजापूर तालुक्यातील काहीही झाले तरी शिवसेना शिंदे गट व भाजपची युती होऊच शकत नाही मग संतोष पाटील जाधव हे दिनेश परदेशी व आमदार बोरनारे या पारंपारिक राजकीय प्रतिस्पर्ध्यांचे फोटो प्रसिद्धी पत्रकात छापून काय इप्सित साध्य करणार आहे हे मतरांना न कळण्याइतपतचीं दयनीय परिस्थिती सध्या राहिलेली नाही.

### युती तुटली तर संतोष जाधवांच्या हाती राहिल कमळ, धनुष्यबाण राहिल कमजोर!

● जर गंगापूर तालुक्यामध्ये जिल्हा परिषद निवडणुकीत शिवसेना भाजप युती झाली नाही तर शिल्लेगाव जिल्हा परिषदेत आमदार प्रशांत बंब यांच्यामुळे भाजपचे पारडे जड राहिल व संतोष जाधव यांच्या हाती भाजपचे कमळ असेल व युती तुटल्याने शिवसेनेच्या धनुष्यबाणाला मतदार जय महाराष्ट्र करतील कारण संतोष जाधव यांच्या तुलनेत शिवसैनेकडे साम, दाम, दंड, भेद व ट्रिपल "M" असलेला तुल्यबळ उमेदवार नाही व जर युती झाली व जागा शिवसेनेने सुटली तर शिवसेनेच्या सर्व कमजोर बाजू आमदार प्रशांत बंब भरून काढतील व संसद जाधव यांनी भाजपला जय श्रीराम करून अपक्ष निवडणूक लढवली तर त्यांच्या राजकारणाचा असलेला कळस जमिनीवर पडल्याशिवाय राहणार नाही तरीही सध्या तळ्यात मळ्यात असलेले जाधव यांना नशीब साथ देईल का हे येणारा काळ सांगेल.

## बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये समविचारी पक्ष संघटनेचा सक्षम पर्याय देण्यासाठी लवकरच बैठक

**— भाई मोहन गुंड** ● पान १ वरून... सर्वांनुमते पुढील रणनीती ठरवून जिल्ह्यात शेतकरी, कामगार, श्रमजीवी वर्ग आणि सर्वसामान्य जनतेचा राजकीय आवाज बळकट करण्याचा संकल्प केला जाईल. बीड जिल्ह्यात शांत, संयमी आणि विचारप्रधान राजकारणाचा पाया मजबूत करण्यासाठी ही आघाडी सक्षम पर्याय ठरणार असल्याचे भाई मोहन गुंड यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितले. कुठल्या ही प्रस्थापित पक्षावर सामान्यचा विश्वास राहीला नाही म्हणून, जिल्ह्यातील समविचारी पक्ष संघटनेच्या तरुण कार्यकर्त्यांनी या लढ्यात सहभागी होण्याचे आवाहन भाई मोहन गुंड यांनी केलं आहे.

सांजदैनिक बीड वास्तव

सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक -अरविंद ओव्हाळ (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

विशेष



## शंखनाद!

आठव माझ्या भीमाची पुण्याई,
त्याच्या संघर्षाची, त्याच्या विद्रोहाची कहाणी..
वर्गाच्या बाहेर शिकला, तरी सिंहासन गाठलं..
अन्यायाच्या भिंतीला शब्दांनीच फोडलं!!

ज्ञानाच्या दीपाने अंधार उजळवला..
दीनदलितांना मानवतेचा हक्क त्याने दिला!!
भीम म्हणाला "शिका, संघटित व्हा, आणि संघर्ष करा"..
शासनकरती जमात होऊन थेट क्रांतीचा वार करा!!

आज त्याच्या विचारांनी जग दुमदुमलं..
पण वास्तवात मात्र स्वप्न अजून अधुरं राहिलं!!
आताची स्थिती बघून त्याच्या डोळ्यांत आलं असतं पाणी..
कारण भेदभाव अजूनही पेटवतो नवी ज्योती कडवटपणी!!

आरक्षणावरून भांडतात आता..
जातपातीत हरवतात आता!
ज्याने दिलं संविधानाचं दान..
त्यालाच विसरतात हे सुशिक्षित बेईमान!!

भीमा, तुझ्या पुण्याईला कधी न्याय मिळणार?
समतेचा सूर्य कधी आभाळभर उगवणार?
तुझ्या जयंत्या साजऱ्या होतात ढोल-ताशांनी..
पण विचार मात्र दडतात घोषणांच्या आवाजांनी!!

आजही कुणीतरी विहिरीवर पाणी भरू शकत नाही..
आजही कुणीतरी मंदिराच्या दारात उभा राहू शकत नाही...
शिक्षणाचं दान अजूनही साऱ्यांना नाही..
म्हणूनच तुझ्या डोळ्यांत पुन्हा येईल पाणी!!

तरीही तुझ्या नावाने उठतो लढा..
तरुणाईच्या मनात जळतो तुझा ज्योतीचा सोन्यापरी सदा...
भीम, तुझ्या विचारांनी अजूनही धडधडतं हृदय..
तुझ्या स्वप्नांना पूर्ण करण्याचं आम्ही घेतो वचन नित्य!!

आम्ही उचलू तुझा झेंडा उंच..
भेदभाव विसरून करून नव्या मानवतेचा संच!!
समतेची दुनिया, बंधुत्वाचा देश,
भीमा, तुझ्या पुण्याईला देऊ खरी ओळख, खरा जोश!!

आठव माझ्या भीमाची पुण्याई,
त्याच्या लेखणी वरच उभी आहे आजची लढाई...
जोवर शेवटचा शोषित मोकळा होत नाही..
तोवर तुझ्या स्वप्नांचा शंखनाद सोन्या थांबवू देणार नाही!!

**- महेश सावंत**
मुंबई. मो.७७३८४७७५४६

# बीड-नाळवंडी रस्त्यासाठी ग्रामस्थानी काढला 'बैलगाडी', 'थाळीनाद' आणि 'अर्धनग्न' मोर्चा

**➤ रस्ता द्या मत घ्या, म्हणत नागरिकांनी व्यक्त केला संताप ➤ गुन्ह्याची भीती दाखवत मोर्चा उधळून लावण्याचा प्रयत्न! ➤ पेठ बीड पोलिसांचा डाव ग्रामस्थांनी हाणून पाडला!!**

**बीड | अमोल जाधव**

गेल्या कित्तेक वर्षापासून बीड नाळवंडी रस्त्याची मागणी वारंवार चालू आहे मात्र वीस वर्षापासून चालू असलेल्या या मागणीला अजून काही न्याय मिळाला नाही, गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत पोते भरून निवेदने या बीड नाळवंडी रस्त्यासाठी देण्यात आली, मात्र अद्याप हा रस्ता कुणी करून द्यायला तयार नाही, या रस्त्यासाठी अनेक आंदोलने, मोर्चे निघाले मात्र सगळ्या प्रतिनिधींनी या कडे पाठ फिरवलेली दिसत आहे, बीड नाळवंडी रस्ता नीट नसल्याने नाळवंडी सह चिंचोली, दहिफळ, अन्य गावाचा संपर्क तुटलेला आहे, या वर्षी झालेल्या पावसाच्या अतिवृष्टी मुळे पूर्ण रस्ता च वाहून गेला, आणि या रस्त्या लगत आलेल्या खडी क्रेशर मुळे



या रस्त्याचे तीन तेरा वाजलेले दिसत असून रस्त्यावर चक्क कंबरा एवढे एक हजार पेक्षा जास्त खड्डे पडले असतील, नाळवंडी सह पंचक्रोशीतील जवळपास सोळा ते सतरा गावाने एक निर्णय घेत आज सर्व गावकऱ्यांच्या वतीने बैलगाडी, थाळीनाद, अर्धनग्न मोर्चा चे आयोजन करण्यात आले होते, मोर्चा गावाकडून निघाला मात्र नाळवंडी नाका येथे रीतसर परवानगी असताना देखील पेठ बीड पोलिसांनी हा मोर्चा अडवण्याचा प्रयत्न केला, एक दोन तासाच्या नंतर नागरिक ठाम असल्या कारणाने ग्रामस्थ जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मोर्चा घेऊन निघाले, मात्र सामान्य नागरिकांना खोट्या गुन्ह्याची भीती दाखवत मोर्चा उधळून लावण्याचे काम पोलिस यंत्रणेकडून करण्यात आले मात्र कोणत्या ही भीतीला न घाबरता ग्रामस्थानी पोलिसांचा डाव हाणून पडला, आणि योग्य आणि शांत पद्धतीने मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर येऊन धडकला, या रस्त्याच्या बाबतीत ग्रामस्थानी अतिशय तीव्र भावना व्यक्त केल्या, या वेळी सर्व ग्रामस्थानी एक मताने निर्धार करत रस्ता द्या मत घ्या म्हणत आमचा रस्ता या आठ दिवसात मंजूर नाही झाला तर येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकावर बहिष्कार टाकणार आहेत, आणि यापेक्षाही मोठे जन आंदोलन उभारू असा निर्धार आज ग्रामस्थांच्या एक मताने करण्यात आला, या मोर्चाला मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ आणि महिलांचा देखील समावेश होता, रस्ता लवकर द्या म्हणत ग्रामस्थानी संताप व्यक्त केला. येणाऱ्या स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अगोदर हा रस्ता होईल का नाही याकडे सर्व बीड जिल्ह्याचे लक्ष वेधलेले आहे.

## आष्टी वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड. ताहेर, उपाध्यक्षपदी ॲड.खिल्लारे तर सचिवपदी ॲड. पोकळे यांची अविरोध निवड

**➤ आष्टी : प्रतिनिधी**

आष्टी वकील संघाची वार्षिक निवडणूक प्रक्रिया उत्साहात आणि मैत्रीपूर्ण वातावरणात पार पडली. दिनांक ३ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या सर्वसाधारण बैठकीत निवडणुकीबाबत चर्चा सुरू असताना जेष्ठ विधिज्ञांनी निवडणूक अविरोध करण्याचा प्रस्ताव मांडला. त्यास सर्व सदस्यांनी एकमताने संमती दिली. यानंतर झालेल्या निवड प्रक्रियेत ॲड. सय्यद ताहेर यांची अध्यक्षपदी ॲड. बाप्पासाहेब खिल्लारे यांची उपाध्यक्षपदी ॲड. उध्दव पोकळे यांची सचिवपदी, ॲड. जे. जी. खंडागळे यांची कोषाध्यक्षपदी, तर ॲड. सोनल केरूळकर यांची महिला प्रतिनिधी म्हणून अविरोध निवड करण्यात आली. अध्यक्षपदासाठी सय्यद ताहेर यांच्या नावाची सूचना ॲड. आदिनाथ पोकळे यांनी केली. कार्यकारिणीची घोषणा झाल्यानंतर नव्याने निवड झालेल्या



सर्व पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सर्व सदस्यांनी नव्या कार्यकारिणीचे अभिनंदन करून भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या बैठकीस तत्कालीन अध्यक्ष ॲड. ए. एन. जेवे अध्यक्षस्थानी होते. निवडणूक बैठकीसाठी संघाचे जेष्ठ व कनिष्ठ सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये ॲड. आर. टी. जगताप आबा, ॲड. बाबुराव अनारसे, ॲड. राकेश हंबर्डे, ॲड. पंढरीनाथ पारखे, ॲड. हनुमंत शिंदे, ॲड. आदिनाथ पोकळे, ॲड. बाळासाहेब मोरे, ॲड. अविनाश निंबाळकर, ॲड. महादेव मोहिते, ॲड. इरफान शेख, ॲड. महादेव तांदळे, ॲड. रत्नदीप निकाळजे, ॲड. बाळासाहेब झांबरे, ॲड. नवनाथ विधाते, ॲड. शरद चौधरी, ॲड. बाबासाहेब घोलप, ॲड. नवनाथ शेकडे, ॲड. भोकरे, ॲड. बापूराव गर्जे, ॲड. प्रविण डोंगरे, ॲड. नलावडे, ॲड. रियाज शेख, ॲड. गोविंद घुले आदींचा समावेश होता.

## इंजि. धनश्री तडवळकर यांची राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या मराठवाडा विभाग अध्यक्षपदी नियुक्ती





**➤ छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षांपासून धनश्री तडवळकर या राष्ट्रवादी युवती काँग्रेसमध्ये कार्यरत असून, युवती जिल्हाध्यक्ष या पदावर त्यांनी अत्यंत प्रभावीपणे काम पाहिले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली पक्षाची संघटनात्मक वाढ आणि विविध सामाजिक उपक्रमांतून युवतींच्या प्रश्नांना दिशा मिळाली आहे.

धनश्री तडवळकर यांनी पक्ष एकत्र असतानापासूनच मा. शरदचंद्रजी पवार साहेबां यांच्या विचारांप्रमाणे काम करत, पक्षाच्या प्रत्येक उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला आहे. त्यांच्या कार्यकुशलतेचा व नेतृत्वगुणांचा विचार करून ही जबाबदारी त्यांना देण्यात आली आहे.

या नियुक्तीबद्दल धनश्री तडवळकर यांनी पक्षश्रेष्ठींचे आभार मानले असून, "मराठवाड्यातील युवतींना सशक्त करण्यासाठी आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विचार प्रत्येक घराघरात पोहोचविण्यासाठी मी प्रामाणिक प्रयत्न करीन," अशी प्रतिक्रिया दिली आहे.

या नियुक्तीमुळे मराठवाडा विभागात युवती काँग्रेसला नवी ऊर्जा आणि दिशा मिळेल, असा विश्वास पक्षातील वरिष्ठांनी व्यक्त केला आहे.

## सौ. वृषालीताई नितिन जायभाये नगराध्यक्ष पदाच्या निश्चित उमेदवार

● पान १ वरून...


अनेक समस्या आहेत. शहराला पिण्याच्या शुद्ध पाण्याच्या पुरवठ्यासह घनकचऱ्याचा व नियमित सफाईच्या कामांचाही प्रश्न फार मोठ्या संकट स्वरूपामध्ये सातत्याने भेडसावत आहे. मुस्लिम बहुल वार्डामध्ये रस्ते, नाल्या, पिण्याचे पाणी, सफाई व सर्वच मूलभूत सुविधांच्या विकासाच्या कामांच्या अभावी मानवी ' जीवन स्तर हेतू पुरस्सर पद्धतीने प्रचंड ढासळवण्यात आला आहे. आपले मुस्लिम बांधव, महिला-भगिनी ज्येष्ठ थोर आणि लहान मुले प्रचंड हाल अपेष्टा सहन करत आहेत. ज्येष्ठ थोर व लहान मुले यांच्यात सातत्याने आरोग्याचे प्रश्न निर्माण झालेले आपल्याला दिसून येतात. एकंदर आपल्या सर्वांच्या पुढच्या पिढीचे भवितव्य या सर्व घराणे ' शहां ' नी धोक्यात आणले आहे. या सर्व भ्रष्ट व्यवस्थेला आळा घालण्याची आता वेळ आलेली आहे. जनतेने जागृत होणे फार गरजेचे आहे. आपल्या पुढच्या पिढीचे भविष्य-भवितव्य आपल्याच हातात आहे. सर्वांनी आपल्या पुढच्या पिढीच्या चांगल्या भवितव्याचा विचार करत चांगले लोकप्रतिनिधी व चांगली नगराध्यक्षा निवडून देण्याची गरज आहे. आपल्या सर्वांच्या व आपल्या पुढच्या पिढीच्या भवितव्याचा विचार करत बीड शहर बचाव मंच सर्व पुरेगामी विचारांच्या चळवळीतील लोकांना सोबत घेऊन योग्य उमेदवाराचा पर्याय आपल्याला देत आहे. तरी सर्व चळवळीतील लोकांच्या सहकार्यावर व जनाधारावर नगर अध्यक्षपदासाठी उभ्या असलेल्या उमेदवार ' सौ. वृषालीताई नितिन जायभाये ' यांना आपण सर्वांनी प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## युवा नेतृत्व जयदत्त (भैय्या) धस यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा

आष्टी : आष्टी, पाटोदा, शिरूर मतदारसंघाचे युवा नेतृत्व जयदत्त (भैय्या) धस यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, जेष्ठ पत्रकार राजेंद्र लाड, समाजसेवक तथा पत्रकार समीर शेख, अक्षय विधाते, सचिन पवार, विजय राऊत दिसत आहेत.



## महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - **
अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | ■ | धु | ■ | टो | क | दा | र |
| सा | ग | र | ■ | म | ■ | स | ई | प | रां | ज | पे | ■ | दा | स |
| ■ | न | ■ | द | ■ | वा | र | स | ■ | डे | रा | ■ | लू | ■ | वं |
| अ | म | री | श | पु | री | ■ | ■ | म | ■ | सं | क | ट | ■ | ती |
| ना | त | ■ | र | त | ■ | चौ | क | शी | ■ | ध | ■ | मा | घ | ■ |
| थ | ■ | र | थ | ■ | मा | का | ■ | द | र | ■ | खा | र | ■ | क |
| ■ | मो | द | ■ | क | ल | र | व | ■ | वा | ट | प | ■ | त | म |
| मे | ह | न | त | ■ | व | ■ | जी | व | न | ■ | र | ख | वा | ला |
| ह | र | ■ | ■ | क | ण | ख | र | ■ | गी | त | ■ | रू | ■ | ■ |
| बू | ■ | स | व | ड | ■ | प | ■ | उ | ■ | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | ■ | रा | ■ | उ | दा | ह | र | ण | ■ | श | र |
| ■ | त्न | ■ | रा | ज | धा | नी | ■ | स | ल | ■ | जी | व | ■ | बे |
| न | मा | ज | ■ | न्म | ■ | ल | ग्न | ■ | का | ■ | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | ■ | ना | म | ■ | भी | ■ | अ | ■ | पा | ■ | ■ |
| ली | ■ | त | ग | म | ग | ■ | स | म | ज | दा | र | ■ | शो | ध |

